जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 JUL 2024 तरूण भारत

# वृक्षारोपण करून जगवणे महत्वाचे : डॉ. शिंदे

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिकीकरणात पुढच्या पिढीसाठी वृक्षारोपण करून ती झाडे वाढवण्याची गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. न्यू कॉलेजमधील ग्रीन क्लब, एनसीसी, भुगोल व राज्यशास्त्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे संचालक प्रा. विनय पाटील यांनी प्रास्ताविक केले. हणबरवाडी येथे ६० झाडे लावण्यात आली. संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रबंधक एम. वाय. कांबळे, डॉ. मनीषा नायकवाडी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUL 2024
सकाळ

# पुढील पिढीसाठी झाडे लावणे महत्त्वाचे : शिंदे

कोल्हापूर : श्री शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या न्यू कॉलेजचा ग्रीन क्लब, एन. सी. सी, भूगोल व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हणबरवाडी येथे वृक्षारोपण करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण झाले. यावेळी डॉ. शिंदे यांनी झाडांचे महत्त्व व त्यांची उपयुक्तता सांगत पुढील पिढीसाठी झाड लावणे व जगवणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. संचालक प्रा. विनय पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक करताना संस्थेच्या हणबरवाडी येथील शेतामध्ये २० एकर परिसरात चार हजार देशी झाडे असल्याचे सांगितले. यावेळी संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील, डॉ. मनीषा नायकवडी, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रबंधक एम. वाय. कांबळे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUL 2024
पुण्यनगरी

# न्यू कॉलेजतर्फे हणबरवाडीत वृक्षारोपण

कोल्हापूर : न्यू कॉलेजच्या ग्रीन क्लब, एनसीसी भूगोल व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हणबरवाडी येथे वृक्षारोपण करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संचालक प्रा. विनय पाटील यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या हणबरवाडी येथील शेतीची माहिती दिली. संस्थेच्या २० एकर परिसरामध्ये ४ हजार देशी झाडे आहेत, असे त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. मनीषा नायकवडी यांनी केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रबंधक एम. वाय. कांबळे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

08 JUL 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

बिग स्टोरी

# नवे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना करणार सक्षम

## रोजगाराभिमुखता वाढविण्यासाठी कौशल्य विकासावर असणार भर

**शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता वाढविण्यासाठी नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे धोरण राबविले आहे. याअंतर्गत अनेक पदव्युत्तर अभ्यासक्रमांसह पदवीस्तरीय आणि एकात्मिक अभ्यासक्रमही राबविण्यास प्रारंभ केला आहे. त्यांना विद्यार्थ्यांचा प्रतिसादही आहे. यावर्षीपासून आठ नव्या अभ्यासक्रमांची भर पडली आहे. त्यात पदवीचे पाच आणि पदव्युत्तर तीन अभ्यासक्रमांचा समावेश आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवीच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन विद्यापीठात शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे.**

– संतोष मिठारी

### पारंपरिक अभ्यासक्रमांना पर्याय

यावर्षी बी. ए. फिल्म मेकिंग, बी. कॉम. बँकिंग अँन्ड फायनान्स, बी. कॉम. (बीएफएसआय), बी. एस्सी.- एम. एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग), बी. एस्सी-एम. एस्सी. संगणशास्त्र भाग एक, बी. एस्सी.-बी. एड. (चार वर्षे एकात्मिक), एम. बी. ए. (एकात्मिक चार वर्षे) आणि एम. ए. एम. एस्सी ट्रॅव्हल अँड टुरिझम अभ्यासक्रम सुरू केला आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये बी. ए. स्पोर्टस्, बी. एस्सी.- एम. एस्सी. इकॉनॉमिक्स (पाच वर्षे एकात्मिक), बी. सी. ए. भाग-एक, एम. ए. योगाशास्त्र भाग एक, एम. एस्सी. जिओ इनफॉर्मेटिक्स, एम. एस्सी. मॅथेमेटिक्स विथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, सेंटर डिस्टन्स एज्युकेशनमध्ये बी. ए., बी. कॉम. अभ्यासक्रम सुरू केले आहेत. विद्यापीठामधील बारावीनंतरचे अभ्यासक्रम हे अन्य महाविद्यालयीन अभ्यासक्रमांपेक्षा वेगळे आहेत. पारंपरिक अभ्यासक्रमांना त्यांच्या रूपाने चांगला पर्याय मिळाला आहे.

### अभ्यासक्रमांची वाढली संख्या

विद्यापीठातील अभ्यासक्रमांची संख्या गेल्यावर्षी ४२ होती. यावर्षी नव्या सहा अभ्यासक्रमांची भर पडल्याने ही संख्या ४८ वर पोहोचली आहे. त्यात पदवीच्या अभ्यासक्रमांची संख्या ४२, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांची संख्या सहा झाली आहे.

### तर, या अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेचा विचार हवा

**विद्यापीठ अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांतील पदवी, पदव्युत्तर अशा विविध २६ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यापीठातर्फे पुनःर्प्रवेश परीक्षा घेतली. त्यात एम. एस्सी. केमिस्ट्री, फिजिक्स, बॉटनी, एम. जे. सी., बी. लिब., आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या सर्व अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहिल्याने पुनःर्प्रवेश परीक्षा घेण्याची वेळ आली. तीन ते चार वर्षांपासून काही अभ्यासक्रमांकडील विद्यार्थ्यांचा ओढा सातत्याने कमी होत असून त्यामुळे दरवर्षी पुनःर्प्रवेश परीक्षा घ्यावी लागत आहे. ते लक्षात घेता अशा अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेचा विद्यापीठाने विचार करणे आवश्यक ठरणार आहे.**

### कौशल्य, रोजगारक्षमता, लवचिकतेची सांगड

शिवाजी विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने काही अभ्यासक्रमांची पुनर्रचना केली आहे. त्याचे उदाहरण द्यायचे झाले, तर पी. जी. डिप्लोमा इन जिओ इनफॉर्मेटिक्स अभ्यासक्रमाला एम. एस्सी.च्या प्रथम वर्षाची समकक्षता दिली आणि एम. एस्सी. जिओ इन्फॉर्मेटिक्स असा अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्यामुळे पी. जी. डिप्लोमा करणाऱ्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षाला प्रवेश मिळाला. ज्या विद्यार्थ्याला एक वर्ष शिक्षण करायचे आहे. त्यांच्यासाठी डिप्लोमाचा पर्याय कायम ठेवला आहे. त्याच धर्तीवर योगाचा अभ्यासक्रम सुरू केला. प्रमाणपत्र, पदविका आणि पदवी या पद्धतीने विविध अभ्यासक्रम घेऊन विद्यापीठ पुढे जात आहे. त्यात कौशल्य विकास, रोजगारक्षमता आणि अभ्यासक्रमाची लवचिकता यांची सांगड घातल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

> विविध पत्ते आणि संकेतस्थळावरील स्वाक्षरीचा गैरवापर करून बनावट गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र तयार केल्याचे प्रथमदर्शनी दिसले आहे. याबाबत चौकशी करून पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.
>
> **-डॉ. अजितसिंह जाधव,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### वर्षनिहाय सुरू झालेले अभ्यासक्रम

- २०२२-२३ : २
- २०२३-२४ : ५
- २०२४-२५ : ४

### नव्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी

| | |
|---|---|
| बीसीए | १०८ |
| बी. एस्सी.- एम. एस्सी. इकॉनॉमिक्स (पाच वर्षे एकात्मिक) | ५३ |
| बी. कॉम (बीएफएसआय) | ४५ |
| बी. ए. स्पोर्टस् | ४४ |
| एम. ए. योगशास्त्र | ४३ |
| बी. ए. फिल्म मेकिंग | १६ |
| एम. एस्सी. मॅथेमेटिक्स विथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | ११ |
| एम. एस्सी. जिओ इनफॉर्मेटिक्स | ८ |
| बी. एस्सी.- एम. एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग) | ४ |

विद्यापीठ कॅम्पसवर बारावीनंतरचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत; पण ते महाविद्यालयातील अभ्यासक्रमांसारखे नाहीत. महाविद्यालयांना स्वायत्तता मिळावी. त्यांनी नवीन अभ्यासक्रम सुरू करावेत, यादृष्टीने त्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठ कॅम्पस आणि महाविद्यालयात अभ्यासक्रम सुरू करण्याचे चांगले पाऊल आम्ही टाकल्याचे त्यांनी सांगितले.

0 8 JUL 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महिनाभर वृक्षारोपण मोहीम : ४,२३,२८५ देशी वाणांचे रोपण

# शिवाजी विद्यापीठाचे ११ हजार विद्यार्थी लावणार देशी रोपे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेचे ११ हजार स्वयंसेवक विद्यार्थी या महिन्यात संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात ४ लाख २३ हजार २८५ देशी वाणाचे रोपण करून व्यापक वृक्षारोपण मोहीम राबविणार आहेत. विद्यापीठ विकास मंच आणि काही पर्यावरणीय संस्था या मोहिमेत सहभागी होणार आहेत.



## देशी वाणांचा समावेश

राज्य सरकारच्या वनधोरणास अनुसरून परिसरनिहाय होणाऱ्या या मोहिमेत कोल्हापूर जिल्ह्यात ४ लाख २३ हजार २८५ देशी वाण असलेल्या रोपांची लागवड होणार आहे. यामध्ये आंबा, जांभूळ, वड, पिंपळ, लिंब, करंज, हिरडा, बेरडा, चिंच, कडुलिंब, बाभूळ, पळस, भोकर, आवळा, साग, ऐन, अर्जुन या स्वदेशी वाणांचा समावेश आहे.

जिल्हा प्रशासनातर्फे सर्व ठिकाणी खड्डे काढून देण्यात येणार आहेत. रोपवाटिकांमधूनही आवश्यक ती सर्व रोपे या मोहिमेत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण बदल, शाश्वत विकास याची दृष्टी निर्माण व्हावी हा उद्देश यामागे आहे.

**- सिद्धार्थ शिंदे,** राज्यपाल नियुक्त सदस्य, व्यवस्थापन परिषद.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागृती निर्माण व्हावी, त्यांच्या रहिवासी क्षेत्राजवळ वृक्षारोपण होत असल्यामुळे, त्या वृक्षांची काळजीही ते विद्यार्थी घेतील अशी विद्यापीठाची अपेक्षा आहे. शिवाजी विद्यापीठाचा एन.एस.एस. विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि वनविभाग यांच्यातर्फे ही मोहीम यशस्वीपणे पार पडेल.

**- तानाजी चौगुले,** राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ यांनी दिली.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव, जागृती निर्माण व्हावी तसेच सामाजिक बांधिलकी जोपासावी या हेतूने शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात ही वृक्षलागवड करण्यात येत आहे. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य आणि विद्यापीठ विकास मंचचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी ही संकल्पना मांडली. त्याला सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला. जिल्हा प्रशासन यासाठी पाठपुरावा करणार असून प्रशासनाच्या मदतीने तालुकास्तरावरही झाडे लावण्यात येणार आहेत. या मोहिमेत शासनाच्या गायरान, पडीक जमीन तसेच शासनाच्या अखत्यारीत असणारी इतर वृक्षलागवड योग्य जमिनीवरही झाडे लावण्याचे नियोजन आहे. सामाजिक बांधिलकी जोपासण्याची चांगली संधी मिळत आहे, या मोहिमेचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 8 JUL 2024
पुण्यनगरी

# 'एका लोकलढ्याची यशोगाथा' शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

आजरा : प्रतिनिधी

श्रमिक मुक्ती दलाचे कार्याध्यक्ष कॉ. संपत देसाई यांचे 'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे पुस्तक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे. या पुस्तकामुळे आजरा परिसरात लढलेला कष्टकऱ्यांचा लढा विद्यापीठीय पातळीवर अभ्यासला जाणार आहे.




सर्वार्थाने फाटकी असलेली माणसं नैतिकता आणि आत्मविश्वासाच्या बळावर शासनासारख्या सर्वशक्तिमान अशा बलाढ्य व्यवस्थेला कशी नामोहरण करू शकतात, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संविधानाच्या चौकटीत राहून सूत्रबद्ध आणि रचनात्मक संघर्ष कसा उभा करू शकतात, याचे संयत दर्शन या पुस्तकातून घडते. आपली बाजू न्याय्य असेल तर परस्परविश्वासने आणि लोकशाही मार्गाने लढा कसा उभारावा आणि तो कसा यशस्वी करावा, याचे शास्त्र या पुस्तकात लेखक संपत देसाई यांनी उलगडून सांगितले आहे. लोकांच्या प्रश्नावर मोठे लढे होतात आणि नोंदीअभावी काळाच्या उदरात ते गायब होतात किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्षित केले जातात, यादृष्टीने या पुस्तकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

या पुस्तकात लढ्याबरोबर या परिसराच्या स्थानिक संस्कृतीबद्दलही आत्मीयतेने लिहिले आहे. आजरा परिसरातील रूढी, परंपरा, प्रथा, इथल्या समाजजीवनाचीही सुंदररीत्या मांडणी केली आहे. अनेक व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांसह इथल्या माणसांचे निसर्गाशी असलेले अतूट नाते, या माणसांचे अभावग्रस्त जगणे याबद्दलची आस्था या लेखनात पाझरत राहते. मृत्युंजयकार शिवाजीराव सावंत यांच्या 'अशी मने असे नमुने' या पुस्तकानंतर हे दुसरे पुस्तक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात अभ्यासक्रमात समाविष्ट केले असल्याने आजरा परिसराचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास यानिमित्ताने अनेक विद्यार्थी अभ्यासणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUL 2024
सकाळ

# कॉ. संपत देसाई यांचे पुस्तक विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात

आजरा, ता. ७ : श्रमिक मुक्ती दलाचे कार्याध्यक्ष कॉ. संपत देसाई यांचे 'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे पुस्तक शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे. कला शाखेतील मराठी विभागाच्या तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी हे पुस्तक राहणार आहे. या पुस्तकामुळे आजरा परिसरात लढल्या गेलेल्या कष्टकऱ्यांचा लढा विद्यापीठीय पातळीवर अभ्यासला जाणार आहे. त्यामुळे तालुक्याचा सामाजिक, सांस्कृतिक व चळवळीच्या इतिहासाला उजाळा मिळणार आहे.

सर्वार्थाने फाटकी असलेली माणसं नैतिकता आणि आत्मविश्वासाच्या बळावर शासन, प्रशासनासारख्या बलाढ्य व्यवस्थेला कशी नामोहरण करू शकतात, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संविधानाच्या चौकटीत राहून सूत्रबद्ध आणि रचनात्मक संघर्ष कसा उभा करू शकतात याचे दर्शन या पुस्तकातून घडते. आपली बाजू न्याय असेल तर अशावेळी परस्पर विश्वासाने आणि लोकशाही मार्गाने लढा कसा उभारावा आणि तो कसा यशस्वी करावा याचे शास्त्र या पुस्तकात लेखक कॉ. देसाई यांनी उलगडून सांगितले आहे.

पुस्तकात जसे लढ्याबद्दलचे वास्तव आहे, तसेच या परिसराच्या स्थानिक संस्कृतीबद्दलही हे पुस्तक तितक्याच आत्मीयतेने बोलते. आजरा परिसरातील रूढी, परंपरा, प्रथा इथलं समाजजीवनही आले आहे. अनेक व्यक्तींच्या स्वभाव वैशिष्ट्यांसह परिसरातील जशी माणसं भेटतात तसा इथला निसर्गही भेटतो. इथल्या माणसांचं निसर्गाशी असलेलं अतूट नातं, या माणसांचं अभावग्रस्त जगणं याबद्दलची आस्था या लेखनात पाझरत राहते. तीच आस्था तीच कळवळा संपूर्ण पुस्तकभर पसरला आहे.

08 JUL 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोटरीच्या करवीर भूषणने प्र कुलगुरू पी. एस. पाटील सन्मानित

प्रतिनिधी
कोल्हापूर

रोटरी क्लब ऑफ करवीरच्या ३४ व्या वर्धापनदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू पी. एस. पाटील यांना करवीर भूषण अवॉर्ड प्रदान करण्यात आला. हा ॲवॉर्ड डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी ॲडमीन रो. विक्रांत कदम, असिस्टंट गव्हर्नर रो. मानसिंग पानसकरव क्लबचे प्रेसिडेंट रो. संजय पाटील, कुशल पटेल, नारायण भोई यांच्या उपस्थित प्रदान करण्यात आला.

यावेळी यशस्वी होण्यासाठी धैर्य चिकाटी तसेच खडतर परिस्थितीत सुद्धा आपले ध्येय साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम तसेच दृढनिश्चयाची आवश्यकता असल्याचे प्र कुलगुरू पी. एस. पाटील यांनी सांगितले. यावेळी नीट परीक्षेमध्ये उत्कृष्ट यश मिळवलेले सुमित संजय पाटील, पूर्णय पंडित जाधव व तसेच एमपीएससी परीक्षेमध्ये उज्वल यश संपादन करणय्रा सौ. नम्रता अक्षय भोई यांचाही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : प्रकुलगुरू पी. एस. पाटील यांना करवीर भूषण ॲवॉर्डने सन्मानित करताना रोटरी क्लबचे सदस्य.**

प्रास्ताविक प्रेसिडेंट रो. संजय पाटील यांनी केले. यावेळी असिस्टंट गव्हर्नर रो. मानसिंग पानसकर यांनी क्लबच्या वर्षभरातील कार्याचा आढावा घेतला. तसेच प्रमुख पाहुणे रो. विक्रांत कदम यांनी रोटरी क्लब ऑफ करवीर ने आजपर्यंत शिवाजी युनिव्हर्सिटी सोबत केलेल्या डिस्ट्रिक्ट इव्हेंटची प्रशंशा केली.यावेळी प्रमुख पाहुण्याची ओळख डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी रो. दिलीप शेवाळे यांनी करून दिली. सूत्रसंचालन रो. निशिकांत नलवडे यांनी केले. आभार प्रदर्शन सेक्रेटरी रो. कुशल पटेल यांनी केले